वि.दि.दावा.क्र. २९/२०२३
दुर्गाबाई वि. नारद व इतर
निशाणी क्र.१०१

वादीतर्फे साक्षीदार क्र.१ नारद गोपीचंद दारोडे -
मी शपथेवर सांगतो की,

साक्षीदाराचा सर तपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. केला यांच्यातर्फे सुरु-

माझ्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो मला वाचुन दाखविण्यात आला आणि मराठी भाषेत समजावुन सांगण्यात आला. त्यावर माझी सही आहे.

२. साक्षीदाराला झेरॉक्स करार नामा, मुदतवाढीचा करारनामा आणि खरेदी पत्राची प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली. साक्षीदाराने सांगितले की सदर करारनामा आणि मुदतवाढीचा करारनामा यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे. सदर करारनाम्यास आणि मुदतवाढीच्या करारनाम्यास अनुक्रमे नि.क्र.१०२ आणि १०३ देण्यात येत आहे. तसेच या खरेदीपत्रातील मजकुर देखिल खरा व बरोबर असल्याचे साक्षीदाराने सांगितले असुन सदर खरेदीपत्र हे नि.क्र.५७ वर आहे. तसेच करारनाम्यावर, माझी, वादी क्र.१ आणि २ तसेच एकराम, रामकिशोर, राजेंद्र मिश्रा, चंद्रहास पुरे आणि चंपा दारोडे यांच्या सहया आहेत. त्याप्रमाणे मुदतवाढीच्या करारनाम्यावर वादी क्र.१ आणि २, माझी तसेच एकराम, रामकिशोर आणि चंद्रहास पुरे यांच्या सहया आहेत. करारनामा आणि मुदतवाढीचा करारनामा माझ्या आणि वादीच्या संमतीने लिहिण्यात आला. तसेच विक्रीपत्र हे संजय, नारद, दुर्गाबाई आणि रमेश यांच्या मध्ये झाले असुन आमच्या सर्वांच्या सहया आहे. तसेच सदर खरेदीपत्रावर साक्षीदार म्हणुन शामकुमार आणि दिनदयाल यांच्या सहया आहेत. विक्रीपत्रामधील मजकुर खरा व बरोबर असुन सर्वाच्या संमतीने लिहिण्यात आला होता. ज्यावेळेस धनादेश हरविले होते त्यावेळे दुर्गाबाई आणि रमेश यांनी चेक हरविल्याबाबतचे कबुली पत्र दिले होते आणि माझ्याकडुन रोख स्वरुपात रक्कम रु.१२ लाख रुपये दिनांक २५/१०/२०१० रोजी घेतले होते. साक्षीदाराला कबुलीपत्र दाखविण्यात आले. साक्षीदाराने सांगितले की त्यावर माझी दुर्गाबाई, रमेश आणि साक्षीदार म्हणुन एकराम आणि पुष्पा तसेच मंगेश यांच्या सहया आहेत. कबुलीपत्रातील मजकुर खरा व बरोबर असुन ते तेच आहे. सदर कबुली पत्रास नि.क्र.१०४ देण्यात येत आहे. धनादेश हरविल्याबाबतचे पत्र मी बँकेला दिले होते. सदर पत्र साक्षीदाराला दाखविण्यात आले. साक्षीदाराने सांगितले त्यावर माझी सही आणि बँकेचा सही शिक्का आहे. सदर पत्रास आर्टीकल 'अ' देण्यात येत आहे.

सरतपास पुर्ण.

<u>साक्षीदाराचा उलटतपास वादीतर्फे त्यांचे विधीज्ञ श्री. रविंद्र अंबरवेले यांद्वारे</u> -

०३. दुर्गाबाई आणि त्यांच्या दोन मुलांना मी ओळखतो. मी त्यांना व्यवहार झाल्यापासुन ओळखतो. मी वादीला करार झाल्यापासुन ते खरेदी पत्र होईपर्यंत अंदाजे दहा वेळा भेटलो असेल. हे म्हणणे खरे आहे की वादीला मी व्यवहार झाल्यापासुन चांगल्या प्रकारे ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की वादी क्र.१ अपंग असल्याचे मला माहित आहे. हे म्हणणे खरे नाही की मी वादीला आठ ते दहा वेळा भेटलो नाही. हे म्हणणे खरे नाही की वादींना आठ ते दहा वेळा भेटल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की वादी क्र.१ अशिक्षीत आहे. साक्षीदार स्वतः सांगतो की वादी क्र.१ ला वाचता येतो.

०४. हे म्हणणे खरे आहे की वादग्रस्त मिळकत ही रामटेक रोडला लागुन आहे. गावापासुन थोडया अंतरावर वादमिळकत आहे. वादग्रस्त मिळकतीपासुन हिवरा गाव हे एक किलोमिटर अंतरावर आहे. वादग्रस्त मिळकत ही हिवरा आणि साटक गावाच्या मध्ये आहे. वादग्रस्त मिळकतीला लागुन पाण्याचा कॅनल आहे. हे म्हणे खरे आहे की शेती ही बागायती आहे. हे म्हणणे खरे नाही बागायती शेतीला किंमत नेहमी जास्त असते.

०५. मी दुर्गाबाईच्या पतीला पुर्वी ओळखत नव्हतो. हे मला माहित नाही की दुर्गाबाईच्या पतीचा वादग्रस्त मिळकतीमध्ये खुन झाला होता. मी दुर्गाबाइला तिच्या पतीबददल विचारले असता तिने सांगितले की पती मयत झाल्यानंतर त्यांची नावे लागली. सातबारा उतारा मी पाहिला होता.

प्रश्न- साटक येथे दुर्गाबाई, रमेश आणि रमेशचा लहान भाउ राहत होते

उत्तर त्यांचे वडील देखिल राहत होते.

हे म्हणणे खरे आहे की रमेशचे वडील ब्राम्हणी येथे राहत होते. हे म्हणणे खरे नाही की वादी क्र.१ ही अशिक्षीत असल्याचा, मुलं लहान असल्याचा गैरफायदा घेवुन, शेतजमिन घेण्याचा मी करार केला. साक्षीदाराला करारनामा नि.क्र.१०२ दाखविण्यात आला. करारनामा हा दिनांक २२/०१/२००९ रोजी करण्यात आला होता. करारनामा हा दिनांक १/०४/२००९ रोजी नोटराईज करण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की करारनामा नोटराईज करतांना कोणीही हजर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की दिनांक २२/०१/२००९ रोजीच आमची बोलणी झाली होती. हे म्हणणे खरे आहे की करारनाम्यासाठी स्टॅम्प पेपर हा दिनांक २२/०१/२००९ रोजीच खरेदी करण्यात आला होता. मी कन्हान येथे राहतो. हे म्हणणे खरे आहे की करारनामा हा कन्हान येथे बनविण्यात आला होता. करारनाम्यातील मोबदल्याचा तपशिल हा बरोबर आहे. रक्कम रु.४० हजाराचा धनादेश हा वटविण्यात आला होता. हे

म्हणणे खरे नाही की रक्कम रु.४० हजाराचा धनादेश हा अनादरित झाला होता. धनादेश हा वटल्याबाबतचे कागदपत्र मी पुढील तारखेस दाखल करेल. कराराची सुरुवात म्हणुन ११ हजार रुपये टोकण देण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की टोकण असल्याचे मी खोटे सांगत आहे. शेतीचे सर्व कागदपत्र मी पाहिले होते. जमिन वर्ग-२ असल्याचे मला माहित होते. हे म्हणणे खरे आहे की दिनांक २२/०१/२०१० पर्यंत खरेदी पत्र करण्याचे ठरले होते. मी गुंडेराव वल्द शामराम मसराम यांना मी ओळखतो. ते निसतखेडा येथे राहतात. त्यांना मी चांगल्याप्रकारे ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की गुंडेराव याच्या नावाने मी ठेकापत्र केले. हे म्हणणे खरे आहे की ठेकापत्र करण्याचे वेळेस स्टॅम्प पेपर हा माझ्या नावाने घेण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की विक्रीच्या पत्राच्या वेळेसचा आणि ठेकापत्राच्या वेळेसचा स्टॅम्पपेपर हा एकाच वेळी खरेदी करण्यात आला होता. साक्षीदाराला ठेकापत्र दाखविण्यात आले. साक्षीदाराने सांगितले की त्यावर त्याची साक्षीदार म्हणुन सही आहे. हे म्हणणे खरे आहे की ठेकापत्र हे वादग्रस्त मिळकतीबाबत होते. ठेकापत्रातील मजकुर मला माहित नाही. ठेकापत्रावरील <u>सहीसाठी केवळ नि.क्र.१०५</u> देण्यात येत आहे. हे मला माहित नाही की ठेकापत्र हे एक वर्षावाठी होते. हे म्हणणे खरे नाही की वादग्रस्त मिळकत मला काहीही करुन कब्ज्यात घ्यायची होती.

०६. हे म्हणणे खरे आहे की दिनांक ३०/१२/२००९ रोजी मुदतवाढीचा करार करण्यात आला. वर्ग-२ चा वर्ग-१ झाला नसल्यामुळे आणि शेतजमिनीची मोजणी वादी यांनी केली नसल्यामुळे मुदतवाढीचा करारनामा करण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की मुदतवाढीच्या करारनाम्यामध्ये मी वादी यांना कधीकधी पैसे दिले याचा उल्लेख केलेला आहे. दिनांक २२/०१/२००९ ते ८/१२/२००९ च्या दरम्यान मी एका वेळेस पन्नास हजाराच्या वरती रक्कम दिली नाही. दिनांक ३०/१२/२००९ रोजी मी बारालाख रुपयाचा चेक मी वादी यांना दिला होता. सदर धनादेशाचा क्रमांक हा ८७५८४५ असा आहे. हे म्हणणे खरे नाही की दिनांक ३०/१२/२००९ चा धनादेश मी कधीही दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की दिनांक ३०/१२/२००९ रोजी वादग्रस्त मिळकत वर्ग-१ ची झाली होती. मुदतवाढीचा करारनामा झाल्यानंतर शेतजमिनीची मोजणी झाली होती. मी मोजणीची 'क' प्रत लावलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की खरेदीपत्राच्या वेळे ३२,९१,५५०/- इतकी रक्क्म देण्याचे करारनाम्यात लिहिलेले आहे.

०७. मुदतवाढ ही दिनांक २२/०१/२०११ पर्यंत होती. हे म्हणणे खरे आहे की दिनांक ५/०२/२०१० रोजी मी खरेदीपत्र केले. खरेदीपत्रामध्ये माझे आणि संजय गुप्ता यांची नावे आहेत. हे

म्हणणे खरे आहे की संजय गुप्ताच्या नावाने कोणताही करारनामा वादीने करुन दिला नव्हता. खरेदीपत्रावर लिहून देणार म्हणुन वादी क्र.१ ते ३ यांची नावे आहेत. वादी क्र.३ साठी अज्ञान पालनकर्ता म्हणुन वादी क्र. १ ने सही केली आहे. खरेदीपत्रावर केवळ दोन सहया आहेत.

प्रश्न- वादी क्र.३ साठी दुर्गाबाईने सही केली आहे का ?

उत्तर- वेगळी सही करण्याची गरज नाही.

हे म्हणणे खरे नाही की वादी क्र.१ ने वादी क्र.३ साठी कोणतीही सही केली नाही. खरेदीपत्रामध्ये मोबदला कमी दाखविण्याचे कारण म्हणजे वादीने सांगितले की आम्ही सर्व रक्कम ही बॅँकेमध्ये जमा करु शकत नाही त्यामुळे कमी मोबदल्यामध्ये खरेदीपत्र दाखवा. हे मला माहित नाही की ग्रामीण भागातील शेतजमिनीला टॅक्स लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की वादीने कमी मोबदल्यामध्ये खरेदीपत्र दाखवा म्हणुन सांगितले नाही.

०८. मी दाव्यात उत्तर दिले आहे. दाव्याचे उत्तर मी समजुन घेतलेले आहे. साक्षीदाराला लेखी कैफियतीमधील पान क्र.७ वरिल पॅरा क्र.९ मधील कंसांकित भाग 'अ' हा वाचुन दाखविण्यात आला. साक्षीदाराने सांगितले की त्याला इंग्रजी येत नाही. माझे असे म्हणणे नाही की, लेखी कैफियतीमध्ये काय लिहिलेले आहे, ते मला माहित नाही. माझ्या वकीलांनी मला मराठी भाषेमध्ये समजावुन सांगितलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की खरेदीच्य पुर्वी खरेदीदाराला, मालमत्तेची चौकशी करावी लागते. हे मला माहित नाही की वादी क्र.३ ची मालमत्ता विकत घेतांना जिल्हा न्यायालयाच्या परवानगीची आवश्यकता होती. या खरेदीपत्राच्या वेळेस जिल्हा न्यायालयाची परवानगी घेण्यात आलेली नाही. हे मला माहित नाही की वादग्रस्त मिळकत वडीलोपार्जित असल्यामुळे परवानगीची आवश्यकता होती. हे म्हणणे खरे नाही की खरेदीपत्र हे बेकायदेशीर आहे. हे म्हणणे खरे नाही की वादीची फसवणुक करायची होती म्हणुन मोबदल्याची रक्कम कमी दाखविण्यात आली आहे. सी.ए. हा दुर्गाबाईचा होता आणि त्याने तसा सल्ला दुर्गाबाईला दिलेला होता. माझ्या लेखी कैफियतीमध्ये तसे का नमुद नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की वादग्रस्त मिळकत मी प्रतिवादी क्र.३ व ४ ला विकली आहे. हे म्हणणे खरे नाही की वादग्रस्त मिळकत ही एक करोड रुपयामध्ये विकली. हे म्हणणे खरे नाही की मालमत्ता ही एक करोडपेक्षा जास्त रकमेची असुन, करारनाम्यामध्ये कमी किंमत दाखविली आणि तीसुद्धा वादी यांना दिलेली नाही. माझ्या दिवाणी दावा क्र.२८/२०२३लेखी कैफियतीमध्ये, खरेदीचा मोबदला का नमुद केला नाही, याचे कारण मी सांगु शकत नाही. त्यामधील जबाब मला समजावुन सांगण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की

बारालाख रुपयाचा चेक हा दोन वेळेस मी दिला (एकदा २००९ मध्ये आणि दुस–यांदा २०१२ मध्ये दिला). हे म्हणणे खरे नाही की दिनांक १२/०४/२०१२ चा धनादेश ह दिनांक १६/०४/२०१२ रोजी अनादरित झाला. एस.बी.आय. बँकेमध्ये माझे खाते आहे.

प्रश्न– बारालाखाचा चेक अनादरित झाल्याबददल नोटीस दिली का

उत्तर नोटीस देण्याचा प्रश्न आला नाही, कारण वादीने स्वतःहुन सांगितले की त्यांच्याकडुन चेक गहाळ झाला आहे. त्यामुळे मी त्यांना सदर चेकचे पैसे रोख दिले.

हे म्हणणे खरे नाही की चेकच्या बदल्यात कधी रोख स्वरुपात पैसे दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की कबुली पत्रतील सर्वे नंबर हा चुकीचा आहे. कबुलीपत्रातील स्टॅम्प हा माझ्या नावाने आहे. हे म्हणणे खरे आहे की कबुलीपत्रा मध्ये खरेदीपत्र कधी झाले याचा उल्लेख नाही. कबुलीपत्रामध्ये वादीच्या वडीलांची सही नाही. हे म्हणणे खरे नाही की कबुली पत्र मी खोटे दाखल केले आहे. हे मला माहित नाही की दुर्गाबाई ही सन २००९ नंतर ब्राम्हणी येथे राहत होती. हे म्हणणे खरे नाही की वादी क्र.३हा अज्ञान असतांना, प्रतिवादी क्र.३ व ४ ला विकलेल्या खरेदीपत्रामध्ये, लावलेल्या सातबारा मध्ये वादी क्र.३ सज्ञान असल्याबाबतची नोंद करुन घेवुन सदर सातबारा लावला आणि त्याआधारे शेतजमिनीची विक्री केली.

०९. शेषराव आणि किसन दारोडे यांना मी ओळखत नाही. त्यांची माझी कधी भेट झाली नाही. साक्षीदाराला निशानी ६१ दाखविण्यात आले. साक्षीदाराने सांगितले की सदर खरेदीपत्रामध्ये मी साक्षीदार आहे. सदर खरेदीपत्रावर शेषराव, किसन आणि दुर्गाबाई यांच्या सहया आहेत. खरेदीपत्रातील मजकुर मला माहित नाही. साक्षीदाराला निशानी ६२ दाखविण्यात आले. साक्षीदाराने सांगितले की सदर खरेदीपत्रामध्ये मी साक्षीदार आहे. सदर खरेदीपत्रावर शेषराव, किसन आणि दुर्गाबाई यांच्या सहया आहेत. खरेदीपत्रातील मजकुर मला माहित नाही.

१०. रक्कम रु.१०,०२,०००/- दिनांक २८/०१/२०१० रोजी दिल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही. तसेच रु.१२,८७,५५०/- किसन दरोडे यांना दिल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही.

११.  माझे शपथपत्र मी वाचले आहे. साक्षीदाराला शपथपत्रातील कलम ४ मधील कंसांकित भाग 'ब' वाचुन दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की कंसांकित भाग 'ब' हा खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की वादीला मी रक्कम रु.३५,००,०००/- दिले नाही. रक्कम रु.३५,००,०००/- चा पुरावा मी देण्याची गरज नाही. हे म्हणणे खरे नाही की शपथपत्र मी खोटे दाखल केले आहे.

१२.  वादीचा उलटतपास होतांना मी हजर नव्हतो. वादीचा उलटतपास माझ्या वकीलांनी घेतला. हे म्हणणे खरे नाही की वादी, अपंग अशिक्षीत असल्याचा गैरफायदा घेवुन त्याची जमिन हडप केली आणि जास्तीची रक्कम घेवुन प्रतिवादी क्र.३ व ४ ला ती जमिन विकली. हे म्हणणे खरे नाही की मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. रामटेक येथे दावा ट्रान्सफर झाल्यानंतर त्याची नोटीस मला मिळाली होती.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

L.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2026.03.11 12:55:05 +0530

दिनांक १०.०३.२०२६.
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. khobragade (Gr.-II)